महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com
===========================================================================

जावक क्रमांक – ४०९४/६४ दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# गिरणी कामगाराच्या कुटुंबाला लोकशाही दिनात मिळाला दिलासा

- गिरणी कामगार सोडतीतील वारसाला आवश्यक कागदपत्रे घेऊन पात्र करण्याचे म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांचे निर्देश
- म्हाडामध्ये सातवा लोकशाही दिन उत्साहात; सात अर्जांवर यशस्वी सुनावणी

मुंबई, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ :- महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामात ज्या गिरणी कामगारांनी स्वतःला झोकून दिले होते त्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न म्हाडाने पूर्ण केले. मात्र, काही कामगारांना दुःखद प्रसंगामुळे, कागदपत्रांच्या अडचणींमुळे घराचा ताबा मिळायला अडचणी येत होत्या. अशाच एका गिरणी कामगाराच्या कुटुंबाला आज म्हाडाच्या लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी न्याय मिळवून दिला. त्या कुटूंबाच्या चेहऱ्यावर ते आनंदाचे स्मित पाहून स्वप्नपूर्ती म्हणजे काय, हेच जणु कळत होते.

सन २०१६ मध्ये म्हाडाच्या मौजे कोन (पनवेल) येथील सोडतीत श्री. कंचन प्रसाद यांचे वडील गिरणी कामगार विजेते झाले. पण दुर्दैवाने सोडतीनंतर त्यांचे अचानक निधन झाले. वडिलांचे छत्र हरवल्यामुळे हिरमुसलेला त्यांचा मुलगा श्री. प्रसाद यांनी मग म्हाडाकडे कागदपत्रे सादर केली. मात्र, अपूर्ण कागदपत्रांमुळे त्यांना अपात्र घोषीत करण्यात आले होते. अखेर त्यांनी म्हाडाच्या लोकशाही दिनात दाद मागितली. म्हाडाच्या उपाध्यक्षांनी हे प्रकरण समजून घेतले. स्वतः लक्ष घालत त्यांनी लोकशाही दिनात सादर केलेल्या अर्जवर सुनावणी केली. श्री. प्रसाद यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून त्यांना पात्र करण्यात यावे, असे निर्देश म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आज दिले. अनेक दिवसांपासून प्रलंबीत प्रश्न मार्गी लागल्यामुळे प्रसाद यांच्या चेहऱ्यावर स्मित उमलले होते. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वतीने वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात आज सातव्या लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या लोकशाही दिनात श्री. जयस्वाल यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

पुनर्वसन इमारतीतील कुटुंबाचे मोठ्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याचा असाच एक महत्त्वपूर्ण निर्णय श्री. जयस्वाल यांनी आज दिला. सन १९७७-७८ मध्ये करी रोड येथील म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतीच्या शिवराज भवन या पुनर्विकसित इमारतीतीत मूळ मालक श्रीमती वनिता कांबळे यांना देकारपत्रात २८० चौरस फूट आकारमानाची पुनर्विकसित सदनिका देण्याचे नमूद असताना १६० चौरस फूट आकारमानाची सदनिका देण्यात आली आहे. याबाबत आजच्या लोकशाही दिनात प्राप्त अर्जावर सुनावणीवेळी श्रीमती कांबळे यांना उर्वरित क्षेत्रफळाची सदनिका देण्यात यावी, असे निर्देश श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अधिकारी यांना आज दिले. श्रीमती कांबळे यांना सदर सदनिका देताना त्यांच्याप्रमाणेच त्याच इमारतीत कमी आकारमानाची पुनर्विकसित सदनिका मिळालेल्या व सदनिका विक्री न केलेल्या सुमारे १८ मूळ मालकांनाही देकारपत्रात नमूद आकारमानाची सदनिका देण्यासाठी महिनाभरात धोरण तयार करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अर्जदार श्री. अनिल संकपाळ यांच्या अर्जावर सुनावणी करताना सन २०१२ मध्ये सोडतीतील मानखुर्द येथील गृहनिर्माण योजनेतील इमारतीची दुरूस्ती संबंधित विकासकाने एक महिन्याच्या आत करून देण्याची नोटिस देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

अर्जदार श्री. किसन तनपुरे हे उपकरप्राप्त इमारतीतील मूळ भाडेकरू/रहिवाशी असून ५० वर्षांपासून संक्रमण शिबिरात वास्तव्यास आहेत. मात्र, तरी देखील त्यांच्याकडून सुमारे महिना रु. ३००० वाढीव भाडे आकारले जात असल्याप्रकरणी केलेल्या अर्जावर सुनावणी करताना श्री.जयस्वाल यांनी उपमुख्य अधिकारी / संक्रमण गाळे यांनी याप्रकरणी सुनावणी घेऊन श्री. तनपुरे यांच्याकडून महिना रु. ५०० भाडे आकारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

श्री. भास्कर येवले यांच्या अर्जावर सुनावणी करताना उपनिबंधक, पूर्व विभाग, मुंबई मंडळ यांनी चौकशी करून चौकशी अहवाल सादर करण्याच्या निर्देश दिले.

आज लोकशाही दिनी प्राप्त झालेल्या ९ अर्जापैकी पाच अर्ज मुंबई मंडळाशी तर चार अर्ज हे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाशी संबंधित होते.

म्हाडा लोकशाही दिनांतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून निराकरण करण्यात येत असल्याचे अनुभव अर्जदारांना आले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


म्हाडा
MHADA
म्हाडा
लोकशाही
दिन

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

Outward No. : 4094/64 Dt. October 14, 2024:

Press Release

## Mill Workers' Family Finds Relief on Lokshahi Din

- MHADA Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal, directs officials to assist mill workers' family members with proper documentation to claim housing benefits.
- MHADA marks its 7th Lokshahi Din successfully, resolving seven applications

Mumbai, October 14, 2024: The long-standing dream of homeownership, held by the mill workers who once fueled Maharashtra's economy and participated in its freedom struggle, continues to be fulfilled by MHADA. However, some families have faced difficulties in receiving their rightful homes due to unforeseen circumstances or incomplete documentation. On today's Lokshahi Din, MHADA's Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal, provided a much-needed solution to one such mill worker's family, helping them secure their long-awaited home.

In 2016, Mr. Kanchan Prasad's father, a mill worker, won a home through MHADA's Panvel lottery. Tragically, his father passed away before taking possession of the house. Mr. Prasad tried to claim the home, but his application was denied due to incomplete paperwork. On presenting his case during MHADA's Lokshahi Din, Mr. Jaiswal reviewed the issue and directed officials to help Mr. Prasad complete the necessary documents, allowing him to become eligible and claim the house. This timely intervention ended a long-pending dispute and brought great relief to the family.

The 7th Lokshahi Din was hosted at MHADA's Bandra East headquarters, where Mr. Jaiswal also addressed several other significant issues. One of the notable cases involved a family from Shivraj Bhavan, a redeveloped building at Curry Road. The original tenant, Mrs. Vanita Kamble, had been allotted a 280 sq. ft. apartment as per her agreement, but received only 160 sq. ft. during the handover. Mr. Jaiswal instructed that the family be provided the correct-sized apartment. Furthermore, he directed MHADA officials to create a policy within a month to ensure that 18 other original tenants in the same building, who also received smaller homes, are allotted their rightful apartments.

In another instance, applicant Mr. Anil Sankapal raised concerns over delayed repairs in a building at Mankhurd under a 2012 housing scheme. Mr. Jaiswal directed the concerned officials to issue a notice to the developer, asking them to complete the necessary repairs within a month.

Additionally, Mr. Kisan Tanpure, an original tenant residing in a transit camp for over 50 years, reported being charged an excessive rent of Rs. 3000 per month. Mr. Jaiswal addressed this issue by instructing the Deputy Chief Officer to assess the case and propose a revised rent of Rs. 500 per month, thereby providing relief to Mr. Tanpure.

Lastly, in response to Mr. Bhaskar Yewale's petition, Mr. Jaiswal ordered the Deputy Registrar of the Eastern Division to conduct a thorough investigation and submit a detailed report.

Of the nine applications heard today, five were related to the Mumbai Housing Board and four were linked to the Mumbai Building Repair and Reconstruction Board. MHADA's Lokshahi Din has once again demonstrated its commitment to resolving citizens' concerns swiftly and fairly, reinforcing trust in its public services.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer / MHADA

---